# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोल्हापूर येथील सावित्रीबाई फुले हॉस्पिटलमधील बहुतांश विभाग बंद असल्याबाबत

**(१) ७४७८३ (१८-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील सावित्रीबाई फुले हॉस्पिटलमधील बहुतांश विभाग बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयाला आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१९) :** (१), (२) व (३) कोल्हापूर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले रुग्णालयामध्ये माहे डिसेंबर, २०१६ दरम्यान अल्ट्रासाऊंड, एक्स-रे, आय.सी.यु व सुसज्य ॲम्बुलन्स यांसारख्या सेवा उपलब्ध नसल्याने काही विभाग पूर्णत: कार्यरत नसल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, आता उपरोक्त सेवा उपलब्ध करुन दिल्या असून सद्यस्थितीत सदर रुग्णालय सुसज्य व पुर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दक्षिण मुंबईतील कंबाला हिल रुग्णालयाबाबत

**(२) ७५३४९ (२०-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील कंबाला हिल रुग्णालयातील विश्वस्थांनी गत ६ महिन्यांपासून रुग्णालयातील कर्मचारी, नर्स, डॉक्टर्स, परिचारीका, आया इत्यादींचा पगार दिला नसल्याने या कर्मचाऱ्यांनी व्यवस्थापकाविरोधात आंदोलन करणे तसेच रुग्णालयास औषधांचा पुरवठा करणाऱ्या दोशी ब्रदर्स, मेहेरा व साईनाथ यासारख्या २५ ते ३० औषध पुरवठादारांचे पैसे थकविले असल्याचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोशी ब्रदर्स, मेहेरा, साईनाथ इ.२५ ते ३० औषध पुरवठादारांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये जामदेवी पोलीस स्थानकात या रुग्णालय व्यवस्थापना विरोधात लेखी तक्रार केली, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणाचा तपास पूर्ण करण्यात आला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व संबंधीत रुग्णालयाच्या व्यवस्थापना विरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (२६-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ३१.३.२०१६ रोजी एम्प्लॉईज ऑफ कंबाला हॉस्पीटल आणि हार्ट इन्स्टीट्यूट द्वारा श्री.रुतूज राठोड यांनी मा.मंत्री (कामगार) यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक ८.१२.२०१६ व दिनांक १७.१२.२०१७ रोजी क्षेत्रीय सरकारी कामगार अधिकारी यांनी केलेल्या निरीक्षणामध्ये माहे सप्टेंबर, २०१६ चा पगार दिला नसल्याचे आढळून आले होते.त्यानुषंगाने सरकारी कामगार अधिका-यांनी किमान वेतन अधिनियम, १९४८, कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० आणि वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत निरीक्षण शेरे पारीत केले. सदरच्या शे-यांतील त्रूटींची पुर्तता विहीत मुदतीत न केल्याने आस्थापनेविरुद्ध अतिरीक्त मुख्य दंडाधिकारी, दादर यांच्या न्यायालयात दिनांक ६ फेब्रुवारी, २०१७ रोजी खटले दाखल करण्यात आले असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(२) हे खरे नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात खाजगी ट्रॅव्हल्सनी गोवा, शिर्डी व महाबळेश्वर येथील बसच्या भाडयात केलेली वाढ**

**(३) ८७६३५ (१४-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी ट्रॅव्हल्सनी गोवा, शिर्डी आणि महाबळेश्वर याठिकाणी जाणाऱ्या बसच्या भाडयात मोठया प्रमाणात वाढ केली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार खासगी ट्रॅव्हल्सकडून केलेल्या भाडेवाढ प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते (१९-०७-२०१९) :** (१) अशा आशयाची बातमी दि.१८.०४.२०१७ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे.
(२) व (३) मा.मुंबई उच्च न्यायालयाने क्र.१४९/२०११ या जनहित याचिकेत दि.१६.०७.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार खाजगी प्रवासी बसेस यांचे भाडेदर निश्चितीचे सूत्र ठरविण्यासाठी सीआयआरटी, पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात येवून या संस्थेव्दारे सादर केलेला अहवाल कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका परिसरातील व्ही.आर.पी. चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेने बायोमेट्रिक सर्वेक्षणाच्या कामात गैरव्यहार केल्याबाबत**

**(४) ९४२८८ (०४-०९-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका परिसरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणा-या नागरिकांच्या बायोमेट्रिक सर्वेक्षणाचे काम व्ही.आर.पी. चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेला देण्यात आले असून या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी महानगरपालिकेच्या शासकीय योजनेतून झोपडपट्टीवासियांना पक्के घरे मिळवून देण्याचे खोटे आश्वासन देऊन लाखोंची फसवणूक केल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार फसवणूक करणा-यांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१९) :** (१) व (२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत नागरिकांचे सामाजिक, आर्थिक बायोमेट्रीक सर्व्हेक्षणांचे काम व्ही.आर.पी. चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेला देण्यात आले होते.

मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३.०७.२०१७ रोजीच्या आदेशान्वये या प्रकरणी यापूर्वीच फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यामुळे सदरची फौजदारी रिट याचिका क्र. ४४/२०१५ याचिका निकाली काढली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील दादर चौपाटी व वरळी येथील समुद्र किनाऱ्यावर रुग्णालयातून फेकण्यात आलेला कचरा सापडल्याबाबत

**(५) ११६६६१ (२८-०७-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर चौपाटी व वरळी येथील समुद्र किनाऱ्यावर रुग्णालयातून फेकण्यात आलेला कचरा सापडल्याची बाब दिनांक २९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कच-यामध्ये मुख्यतः वापरण्यात आलेली इंजेक्शन, सिरीज, सलाईन, उपचारावेळेस वापरलेले कपडे, औषधाच्या बाटल्या, खराब औषधे व रक्त, ऑपरेशनच्या वेळेस काढण्यात आलेला शरीरातील काही भाग अशा गोष्टी आढळून आल्यामुळे समूद्र किनारा अस्वच्छ झाला व हा मेडीकल कचरा आरोग्याला धोकादायक असल्यामुळे तेथे पर्यटक व नागरिकांना जाणे धोक्याचे झाले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयातील कच-याची विल्हेवाट योग्य रितीने करण्यासह ज्या रुग्णालयाकडून मेडिकल कचरा बाहेर टाकण्यात येतो अश्या रुग्णालयावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०१९) :** (१), (२), (३) व (४) अशा आशयाचे वृत्त दिनांक २३.०४.२०१८ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.

• सदर जैविक वैद्यकीय कचरा दादर चौपाटीच्या आजूबाजूच्या परिसरातील हॉस्पिटल व क्लिनिक्स मधून टाकला गेला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

• दादर चौपाटीच्या परिसरातील रुग्णालयांमधील बायोमेडीकल कचरा गोळा करण्याचे कंत्राट एस.एम.एस. नावाच्या संस्थेस देण्यात आले असून या संस्थेमार्फत सदर कचरा गोवंडी येथील प्रक्रिया व विल्हेवाट कैंद्रावर नियमितपणे नेण्यात येतो.

• दादर-माहिम चौपाटीवर महानगरपालिकेचे कर्मचारी व क्लिन-अप मार्शल यांची नियमित देखरेख असते.

• संबंधित विभागाच्या वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत अचानक भेट देऊन पाहणी करण्यात येते.

• जैविक वैद्यकीय कचरा टाकताना आढळल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश महानगरपालिकेमार्फत संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

• दादर-माहिम चौपाटीवर क्लिन-अप मार्शलची गस्त वाढविण्यात आली आहे.

___

**शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालयांतील २९ दिवसांच्या बदली कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत**

**(६) १३४९२२ (१२-०७-२०१९). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालयांतील २९ दिवसांच्या बदली कर्मचाऱ्यांना कायम करण्यात यावे तसेच मुंबईतील सेंट जॉर्ज, जी.टी व जे.जे रुग्णालयातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागण्यांसाठी दिनांक ५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास कामबंद आंदोलन सुरु केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांच्या काम बंद आंदोलनामुळे वैद्यकिय सेवेवर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचा-याच्या मागण्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, कर्मचाऱ्याच्या मागण्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या काम बंद आंदोलनाच्या वेळी पर्यायी व्यवस्था केली जात असल्यामुळे संपाचा वैद्यकीय सेवेवर परिणाम झालेला नाही.

(३) चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा सरळसेवेने तात्काळ भरण्याबाबत तसेच सदर जागा सरळसेवेने भरेपर्यंत तात्काळ रुग्णसेवा देण्यासाठी रिक्त जागांवर २९ दिवसांच्या बदली तत्वावर बदली कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी ही प्रमुख मागणी होती.

(४) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार वर्ग-४ (गट-ड) ची कामे बाह्यस्त्रोतामार्फत करुन घेण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील म्हाडाच्या मोठ्या वसाहतीमध्ये समावेश असलेल्या मोतीलाल नगर (गोरेगाव पश्चिम) येथे मायक्रो सिटी वसविण्याबाबत**

**(७) १३४९७४ (०९-०७-२०१९). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या मोठ्या वसाहतीमध्ये समावेश असलेल्या मोतीलाल नगर (गोरेगाव पश्चिम) या वसाहतीचा पूर्णपणे विकास करून येथे मायक्रो सिटी वसविण्याची योजना तयार केली असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची नियुक्ती केली असून याचा संपूर्ण आराखडा तयार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ठिकाणी पुनर्विकास करताना रहिवाश्यांना कोणकोणत्या सोयीसुविधा पुरविण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासठी शासनातर्फे कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
म्हाडाच्या अहवालानुसार, मोतीलाल नगर, गोरेगाव पश्चिम या वसाहतीचा पुनर्विकास करण्याचे प्रस्तावित आहे, परंतु येथे मायक्रो सिटी वसविण्याबाबत कुठेही उल्लेख नाही.
(२) व (३) म्हडाने कळविल्यानुसार, प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची नियुक्ती करण्याची प्रक्रिया चालू आहे. आराखड्यामध्ये रहिवाशांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधांचे नियोजन करण्यात येते व या जागेचा संपूर्ण आराखडा तयार करण्याबाबतची प्रक्रिया चालू आहे.
(४) प्रकल्प निर्धारित वेळेत करण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत जागेचे योग्य नियोजन व्यवस्थापन, सर्वेक्षण, अंदाजपत्रक, वेळेत निविदा काढण्याच्या दृष्टीकोनातून प्रकल्प नियोजन सल्लागाराची नियुक्ती करण्यात येत आहे, असे म्हाडाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरीवली (पूर्व) येथील एम.एच.बी. कॉलनीतील २६ गृहनिर्माण संस्थांना म्हाडाने थकीत सेवाशुल्कापोटी लाखो रुपयांची देयके पाठविल्याबाबत**

**(८) १३५१०३ (११-०७-२०१९). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (पूर्व) येथील एम.एच.बी. कॉलनीतील २६ गृहनिर्माण संस्थांना म्हाडाकडून थकीत सेवाशुल्कापोटी लाखो रुपयांची देयके पाठविण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या नियमांनुसार तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत रकमेची मागणी करता येत नसतानाही म्हाडाने अचानक २१ वर्षांच्या थकबाकी वसुलीसाठी देयके पाठविल्याने रहिवाश्यांमध्ये तीव्र नाराजीची भावना पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, त्यानुसार म्हाडाकडून वसूल करण्यात येत असलेल्या थकीत सेवाशुल्काचे दर कमी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०१९) :** (१) म्हाडाच्या अहवालानुसार, सदर प्रकरणी मिळकत व्यवस्थापक (बोरीवली), मुंबई मंडळ यांचेमार्फत थकीत सेवाशुल्काबाबच्या नोटीस माहे नोव्हेंबर २०१८ व माहे जाने २०१९ मध्ये पाठविण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर थकीत सेवाशुल्काच्या वसुलीबाबत नोटीस पाठविण्यात आलेल्या नाहीत.
(२) सदर प्रकरणी बऱ्याच संस्थेकडे /थकबाकीधारकाकडे सुधारित दराने बजावण्यात आलेल्या नोटीसांबाबत संस्थेच्या पदाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली व त्याबाबतच्या तक्रारीसुध्दा मंडळास प्राप्त झालेल्या आहेत.
(३) गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णय दि.२७.०३.२०१८ अन्वये मंत्री, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली सुधारीत सेवाशुल्काच्या आकारणीबाबत समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीने सुधारीत सेवाशुल्काच्या आकारणीबाबत शिफारशी केल्या असुन, सदरहू शिफारशी शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या परिवहन विभागामार्फत नवीन रिक्षा परवाने वाटप संख्येवर नियंत्रण ठेवणेबाबत**

**(९) १३५१५२ (०९-०७-२०१९). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या परिवहन विभागामार्फत मोठया प्रमाणात नवीन रिक्षा परवाने वाटप केल्याने रिक्षा व्यवसाय अडचणीत आला असून रस्ता कमी व रिक्षा जास्त अशी परिस्थिती सध्या राज्यात दिसत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्य:स्थितीत एखाद-दुस-या पुराव्याच्या आधारे रिक्षा परवाना परिवहन विभागाकडून दिला जात असल्याने परप्रांतीय व इतर नविन सुशिक्षीत बेरोजगारांचे रिक्षाचालक होण्याच्या प्रमाणात वाढ होत असून ते वाहतूकीच्या नियमांचे काटेकोटपणे पालन

करीत नसल्याने नागरिकांना व प्रामाणिक रिक्षा चालकांना त्याचा विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार रिक्षांच्या परवाने वाटप संख्येवर मर्यादा आणण्यासंदर्भात तसेच नियमांचे उल्लंघन करणा-या रिक्षा चालकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०८-२०१९) :** (१) वर्तमानपत्रात दि.२१.०२.२०१९ रोजी अशी बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) हे खरे नाही.

राज्यातील तीन चाकी तीन आसनी ऑटोरिक्षा व टॅक्सी परवाने जारी करण्यासाठी शासनाने दि. १८.०७.२०१७ रोजी शासन निर्णयान्वये विहित अटी व शर्ती जारी केल्या आहेत. सदर शासन निर्णयात नमूद अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या अर्जदारास परवाना जारी करण्यात येत आहे.

तसेच वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यां रिक्षा चालकांवर परिवहन व पोलीस विभागामार्फत कारवाई करण्यात येते.
(३) व (४) शासनाने दिनांक १७.०६.२०१७ चे अधिसूचनेद्वारे व दिनांक २२.०९.२०१७ चे शासन निर्णयान्वये राज्यातील ऑटोरिक्षा परवान्यावरील निर्बंध उठवून मुक्त परवाने धोरण अवलंबिलेले आहे.

राज्यात माहे एप्रिल २०१८ ते माहे मार्च २०१९ या कालावधीत परिवहन विभागाकडून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण २६,५४२ रिक्षा चालकांवर कारवाई करण्यात आली असून यामध्ये ३,८३६ प्रकरणात परवाना व ४,३९८ प्रकरणात अनुज्ञप्ती निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच रु.५६०.१६ लक्ष तडजोड शुल्क व रू.२३.९७ लक्ष कर वसुल करण्यात आलेला आहे. याशिवाय ऑटोरिक्षा चालकांकडून भाडे नाकारण्यासंदर्भात परिवहन विभागाकडून करण्यात येत असलेल्या विशेष तपासणी मोहिमेत मुंबई विभागामध्ये ६७० भाडे नाकारणाच्या प्रकरणी दोषी ऑटोरिक्षा चालकांची अनुज्ञप्ती रद्द करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयातील २८ तलाव खाजगी मालकांच्या नावावर असल्याबाबत

**(१०) १३५१८७ (१०-०७-२०१९). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात लघुसिंचन तलाव, गावतलाव आणि पाझर तलाव असे ९८ तलाव बांधण्यात आले असून यातील २८ तलावांच्या जागा अजूनही खाजगी मालकांच्या नावावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावांच्या मुख्य जागेला शासनाचे नाव लागण्यासंबंधीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,कोल्हापूर जिल्ह्यातील तलावांच्या जागेला शासनाचे नाव लागण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२९-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर तलावांच्या ७/१२ पत्रकी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर यांचे नाव लावणेसंबंधिचे प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सादर करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**म्हाडाकडून कांदिवली पश्चिम (मुंबई) येथील चारकोप भागात उच्च उत्पन्न गटासाठी काही भूखंड आरडीपी-४ (काड सिध्देश्वर मार्ग) परिसरात विविध गृहनिर्माण संस्थांना व विकासकांना हस्तांतरीत करण्यात आल्याबाबत**

**(११) १३५३३४ (११-०७-२०१९). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून (म्हाडा) ३० वर्षापुर्वी कांदिवली पश्चिम (मुंबई) येथील चारकोप भागात उच्च उत्पन्न गटाचे काही भूखंड आरडीपी-४ (काड सिध्देश्वर मार्ग) परिसरात विविध गृहनिर्माण संस्थांना व विकासकांना हस्तांतरीत करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये किती शासकीय, निमशासकीय क्षेत्रातील विभागांचा समावेश आहे व हे भूखंड हस्तांतरीत करतांना १५ महिन्यात येथे इमारत उभी करण्याचा नियम प्राधिकरणाचा असतांना उक्त नियम धुडकावून बरेच भूखंड सद्य:स्थितीत वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वापराविना पडून असलेल्या भूखंडाबाबत म्हाडा प्राधिकरणाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,
(४) असल्यास, या भूखंडावर अतिक्रमण होऊ नये यासाठी कोणती सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

आरडीपी-४ (काड सिध्देश्वर मार्ग) परिसरात केवळ गृहनिर्माण संस्थांना व शासकीय संस्थांना भुखंड वितरित करण्यात आलेले आहेत. तथापि, हे भूखंड विकासकांना वितरीत करण्यात आलेले नाहीत.

(२) हे खरे आहे.

१) महानगर टेलिकॉम निगम लिमिटेड यांना एकूण १ भूखंड वितरित केलेला आहे. २) इंडीयन एअरलाईन्स यांना एकूण ६ भूखंड वितरित केलेले आहेत. ३) रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांना एकूण ११ भूखंड वितरित केलेले आहेत. संस्थेसोबत झालेल्या भाडेपट्टा करारनाम्यानुसार वितरणापासुन ३ वर्षात भूखंड विकसित करणे बंधनकारक आहे. महानगर टेलिकॉम निगम लिमिटेड यांनी भूखंड विकसित केलेला आहे.

(३) महसुल विभागाने भूखंड विकासकामी मुदत वाढीसंबंधी घेतलेल्या निर्णयाच्या धर्तीवर प्राधिकरणाने ठराव क्र. ६८११ दि. ०४.०१.२०१९ रोजी म्हाडाच्या भाडेपट्टा करारनामाच्या अटी व शर्तीनूसार बांधकामाविना पडून असलेल्या भूखंडाबाबत अधिमुल्य आकारुन त्यांना ५ वर्षापर्यंतची मुदतवाढ बांधकामासाठी देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) संबंधित गृहनिर्माण संस्था / सरकारी संस्था यांचेकडून भूखंडावर अतिक्रमण होऊ नये म्हणून उपाय योजना केल्या जातात, असे म्हाडाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील काळ्या-पिवळ्या टॅक्सी मधील मीटर प्रिंटर बंद असल्याबाबत

**(१२) १३५३४१ (१३-०७-२०१९). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत काळ्या-पिवळ्या टॅक्सीमधून प्रवास केल्यास प्रवाशांनी केलेल्या प्रवासाचे भाडे त्यांना किती आणि योग्य आकारले आहे काय याची खात्री होण्याकरिता प्रत्येक काळ्या-पिवळ्या टॅक्सीतील मीटर सोबत प्रिंटर जोडण्याची सक्ती परिवहन कार्यालयाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानाही मुंबईतील ४० हजार टॅक्सीमधील मीटर प्रिंटर बंद असल्याची बाब माहे एप्रिल,२०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मुंबईतील ज्या काळ्या-पिवळ्या टॅक्सीमध्ये मीटर प्रिंटर नाही अश्या टॅक्सी चालकांवर कारवाई करण्यासह त्यांच्यावर कारवाई करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०८-२०१९) :** (१) महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १३७ मधील तरतूदीनुसार टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक भाडे मीटर बसविणे आवश्यक आहे. तसेच नियम १४० (७ अ) नुसार भाडेमीटरला प्रिंटर बसविण्याची तरतूद आहे.

(२) अशा आशयाची बातमी दि.०४.०४.२०१९ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे.
(३) व (४) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य/पूर्व/पश्चिम) या कार्यालयातील वायुवेग पथकामार्फत टॅक्सीची तपासणी करण्यात येते. तपासणीमध्ये टॅक्सीमधील मीटरचे प्रिंटर बंद असल्यास अशा टॅक्सी चालकांविरुध्द कारवाई करण्यात येते.

तसेच टॅक्सीच्या योग्यता प्रमाणपत्राच्या नुतनीकरणाच्या वेळेस मीटरची तपासणी करतांना मीटर सुस्थितीत असणे व त्यास प्रिंटर बसविल्याची खात्री करण्यात येते. जर मीटर सुस्थितीत नसल्यास व त्यास प्रिंटर बसविले नसल्याचे आढळून आल्यास सदर टॅक्सीचे योग्यता प्रमाणपत्राचे नुतनीकरण केले जात नाही.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) यांनी प्रिटंर सुस्थितीत नसलेल्या एकूण ७ टॅक्सींवर कारवाई करुन ४ प्रकरणात रु.८००/- इतका दंड वसूल केला आहे. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) यांनी प्रिटंर सुस्थितीत नसलेल्या एकूण ५ टॅक्सींवर कारवाई करुन रु. १०००/- इतका दंड वसूल केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील गिरण्यांच्या जागेवरील पुनर्विकास योजनेतील काही घरे विकासकांनी संक्रमण शिबिरांसाठी देण्याबाबत**

**(१३) १३५३६० (०९-०७-२०१९). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गिरण्यांच्या जागेवरील पुनर्विकास प्रकल्पासाठी म्हाडाने खासगी विकासकांना सहभागी केले असून या प्रकल्पांतील काही घरे त्यांनी म्हाडाला संक्रमण शिबिरासाठी देण्याची अट आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत म्हाडाने खासगी विकासकांना किती गिरण्यांच्या जागेवर पुनर्विकास प्रकल्प राबविण्यास दिले आहेत आणि त्यापैकी किती प्रकल्प आजतागायत पूर्ण झाले आहेत,
(३) असल्यास, या खासगी विकासकांकडून मुंबईतील ज्या गिरण्यांच्या जमिनीवर पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत त्याठिकाणी म्हाडाला संक्रमण शिबिरांसाठी आजतागायत किती घरे देण्यात आलेली आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०१९) :** (१) सुधारित विकास नियंत्रण नियमावली ५८(१)(ब) नुसार मुंबईतील कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांचे वाटप साधारणत: १/३ हिस्सा मुंबई महानगरपालिका, म्हाडा व मालक यांना प्रत्येकी देण्याची तरतुद आहे. म्हाडास उपलब्ध होणाऱ्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी २/३ गाळे व संक्रमण सदनिकांसाठी १/३ गाळे बांधण्यात येतात.

(२) म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार, म्हाडा प्राधिकरणाच्या ठराव क्र. ६२७८, दि. ०१.११.२००७ व ठराव क्र. ६२८७, दि. २४.०३.२००८ अन्वये मे. बी. जी. शिर्के यांना गिरण्यांच्या जागेवर पुनर्विकास प्रकल्प राबविण्यास म्हाडाकडून कार्यादेश देण्यात आले आहेत. गिरण्यांच्या जमिनीवरील टप्पा १ अंतर्गत १८ व टप्पा २ अंतर्गत सद्य:स्थितीमध्ये ८ गिरण्यांच्या ६ जमिनींवर गिरणी कामगारांची घरे / संक्रमण सदनिका बांधकामाचे काम पूर्ण झाले आहे व उर्वरित २ गिरण्यांच्या जमिनींवर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रथम टप्प्यात एकूण ३२०४ व दुसऱ्या टप्प्यात एकूण १२९६ संक्रमण सदनिकांचे काम पूर्ण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (ता.जि.नांदेड) येथे पाणी अडविण्यासाठी उपाययोजना करणेबाबत**

**(१४) १३५४८६ (११-०७-२०१९). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (ता.जि.नांदेड) येथे मागील अनेक वर्षापासून सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला असुन येथील नद्यांचे खोलीकरण झाले मात्र पाणी अडविण्याबाबत कोणतीही उपाययोजना नसल्याने हजारो दलघमी पाणी शेजारील तेलगंणाराज्यात सरळ वाहून जात असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव पाणी अडविण्यासाठी कोल्हापूर बंधारे व साखळी बंधारे बांधावे या विभागातील काही गावातील तात्काळ तलाव बांधण्यासाठी पुढाकार घेतला असुन प्रकल्प तात्काळ पुर्ण करावा यासाठी संबंधित ग्रामपंचायतींचा ठराव देखील नांदेड कार्यालयात सादर केला आहे परंतु या प्रकरणी आवश्यक कार्यवाही अदयापही करण्यात आली नसल्याने २५ गावांच्या पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्नही यामुळे प्रलंबित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२९-०८-२०१९) :** (१) व (२) नाही. हे खरे नाही.

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नांदेड कार्यालयामार्फत भोकर तालुक्यामध्ये ७ नाल्यांचे २५.५० किमी लांबीमध्ये नाला खोलीकरणाची कामे करण्यात आलेली आहेत. त्यामुळे या नाला खोलीकरण केलेल्या नाल्यावर असणाऱ्या २२ सिमेंट बंधारे व ४ कोल्हापूरी बंधारे योजनांचा पाणीसाठा वाढला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पुर्ण झाले नसल्याबाबत

**(१५) १३५५८२ (१५-०७-२०१९). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून तसेच शासनाच्या वतीने दरवर्षी ग्रामपंचायत ते नगरपालिकेच्या हद्दीत वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरवून दिले असते परंतु गत दोन वर्षामध्ये सदरहू विभागात वृक्ष लागवड झाल्याचे केवळ कागदोपत्री दाखविण्यात येत असुन प्रत्यक्षात तेथे वनीकरण विभाग व वन विभागाच्या दुर्लक्षामुळे मोठया प्रमाणात झाडांची तोड होत असल्याचे दिनांक १६ एप्रिल,२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्याने शासनाचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यात वीटभट्टयांचे प्रमाण वाढले असुन प्रत्येक विटभट्टीला जळण म्हणून लाकडांचा वापर केला जात असल्याने सदरहू ग्रामीण भागातील बाभूळ, आंबा, लिंबू या वृक्षांची तोड होत असल्याने वृक्षतोडीमुळे मागील दोन वर्षापासून दुष्काळाचे स्वरुप तीव्र होत चालले असून त्यांचे विपरीत परिणाम पर्यावरणावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०८-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम अंतर्गत इतर यंत्रणांप्रमाणे ग्रामपंचायत व नगर पंचायत यांच्या हद्दीत वृक्ष लागवड करण्यासाठी उद्दिष्ट ठरवून देण्यात येते. सदर उद्दिष्टाप्रमाणे संबंधित यंत्रणांनी वृक्ष लागवड केलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लोअर परळ (मुंबई) येथील श्रीनिवास मिल मधील म्हाडाच्या संक्रमण शिबिराच्या पुनर्विकासाबाबत

**(१६) १३५६२५ (०८-०७-२०१९). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ (मुंबई) येथील श्रीनिवास मिल मधील म्हाडाच्या संक्रमण शिबिराच्या पुनर्विकासाचे काम सद्य:स्थितीत अत्यंत संथ गतीने सुरु असल्याची बाब दिनांक २ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीनिवास मिल मधील संक्रमण शिबिराच्या पुनर्विकास कामाची शासनाकडून पाहणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पाहणीत काय आढळून आले आहे त्यानुसार या संक्रमण शिबिराच्या पुनर्विकासाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

म्हाडाच्या अहवालानुसार, श्रीनिवास मिल लोअर परळ येथे एकूण ७२८ सदनिकाच्या (गिरणी कामगार व संक्रमन सदनिका) बांधकामाची कामे तसेच बाह्यसुविधांची कामे सुरु आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई शहरात गत वर्षभरामध्ये घरफोडी व सोन साखळी चोरीच्या गुन्ह्यामध्ये झालेली वाढ

**(१७) १३५६७० (१२-०७-२०१९). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरात गत वर्षभरामध्ये घरफोडी व चैन साखळी खेचण्याच्या गुन्ह्यामध्ये प्रचंड वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती गत वर्षभरामध्ये नवी मुंबई शहरातील घरफोडी व चैन साखळी खेचण्याच्या किती गुन्ह्याची नोंद झालेली आहे, त्यानुसार किती गुन्ह्यांचा तपास लावण्यात पोलीसांना यश आले आहे व किती गुन्हे प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, प्रलंबित गुन्ह्याचा तपास न लागण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व तद्नुसार शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) व (२) नवी मुंबई पोलीस आयुक्तालय या घटकामध्ये घरफोडीच्या गुन्ह्यात ११ ने आणि चैनस्नॅचिंगच्या गुन्ह्यात ४९ ने वाढ झाली आहे.

दाखल गुन्ह्यातील वर्ष निहाय माहिती.

१) घरफोडी

| वर्ष | दाखल | उघड | टक्केवारी | प्रलंबित |
|---|---|---|---|---|
| सन २०१७ | ४४९ | २५१ | ५६% | १९८ |
| सन २०१८ | ४६० | २३५ | ५१% | २२५ |
| जाने. २०१८ ते जुलै २०१८ | २५५ | १२० | ४७% | १३५ |
| जाने. २०१९ ते जुलै २०१९ | २२७ | ८० | ३५% | १४७ |

(२) चैनस्नॅचिंग

| वर्ष | दाखल | उघड | टक्केवारी | प्रलंबित |
|---|---|---|---|---|
| सन २०१७ | ९२ | ६८ | ७४% | २४ |
| सन २०१८ | १४१ | १०४ | ७४% | ३७ |
| जाने. २०१८ ते जुलै २०१८ | ८२ | ६७ | ८२% | १५ |
| जाने. २०१९ ते जुलै २०१९ | ६९ | २० | २९% | ४९ |

(३) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील घरफोडी, चोरी व चैन साखळी खेचण्याचे गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व २ हे पोलीस ठाणे भेटीचेवेळी तपासी अंमलदार यांची दप्तर तपासणी घेवून तसेच आढावा घेऊन बैठकीमध्ये सूचना देण्यात देऊन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

नाकाबंदी, संशयीत मोटार सायकलस्वार चेक करणे, मोबाईल पेट्रोलिंग वाहने, बीट मार्शल पेट्रोलिग, वर्तमानपत्रातून सतर्क करणे, सार्वजनिक कार्यक्रमात प्रबोधन करणे. सोसायट्यांना सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावणे व सेफ्टी डोअर बसविण्याबाबत सूचना देणे, रेकॉर्ड वरील गुन्हेगारांना वेळो वेळी चौकशीसाठी हजर करणे, इत्यादी उपाय योजना करुन घरफोडी व चैनस्नॅचिंगच्या गुन्ह्यांना आळा घातला जातो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वांद्रे (पुर्व) येथील म्हाडा भवनाच्या इमारतीचा ३५० कोटी रुपये खर्चून पुनर्विकास करण्यात येत असल्याबाबत**

**(१८) १३५९८७ (१०-०७-२०१९). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पुर्व) येथील म्हाडा भवनाच्या इमारतीचा ३५० कोटी रुपये खर्चून पुनर्विकास केला जाणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी कोटयवधी रुपये खर्च करावयाचे असतानाही दुरुस्तीवर अनावश्यक खर्च केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन हा अनावश्यक खर्च करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
म्हाडाच्या अहवालानुसार, नजिकच्या काळात गृहनिर्माण भवन इमारतीचा पुनर्विकास करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून त्याबाबत वास्तुशास्त्रज्ञांच्या नेमणूकीकरीता डिझाईनस्पर्धा घेणेबाबत म्हाडाकडुन कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
विद्यमान इमारत सुस्थितीत ठेवण्याच्या दृष्टीने सदर इमारतीच्या आवश्यक सरंचनात्मक दुरुस्तीचे काम करण्यात येते, असे म्हाडाच्या अहवालात नमुद आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बागलाण (जि.नाशिक) तालुक्यात सुरु असलेल्या एन.एन.पी बागलाण न्यूज ॲपवर कारवाई करण्याबाबत**

**(१९) १३६१८१ (०९-०७-२०१९). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बागलाण तालुक्यात (जि.नाशिक) एन.एन.पी बागलाण न्यूज हे मोबाईल ॲप कार्यरत असून या मोबाईल ॲपद्वारे खोट्या बातम्या देणे, राजकीय शासकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकप्रतिनिधी व अधिकारी यांचे संदर्भात बदनामीकारक बातम्या देणे, शासकीय अधिकाऱ्यांना खोट्या बातम्या देण्याचा धाक दाखवून त्यांच्याकडून अपसंपदा गोळा करणे इत्यादी प्रकारे या चॅनलने तालुक्यात दहशत निर्माण केल्याची तक्रार संबंधित लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार संबंधित चॅनेलविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१९) :** (१) होय.
(२) मोबाईल ॲपवर कार्यवाही करण्याचे अधिकार राज्य शासनाशी संबंधित नसून केंद्र शासनाशी संबंधित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विद्यार्थ्यांना कर्नाटक राज्याप्रमाणे सवलतीच्या दरात वार्षिक पास वितरीत करण्याबाबत**

**(२०) १३७१२३ (१०-०७-२०१९). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्नाटक राज्यात शालेय विद्यार्थ्यांना सवलतीच्या दराने वार्षिक एस.टी. पास वितरीत करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथील लोकप्रतिनिधींनी शालेय विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात एस.टी. पास वितरीत करण्यासंदर्भात लेखी पत्राव्दारे मा.मंत्री, परिवहन यांच्याकडे दिनांक ३० नाव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार राज्यातील विद्यार्थ्यांना कर्नाटक राज्याप्रमाणे सवलतीच्या दरात वार्षिक पास वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०८-२०१९) :** (१) सदरची बाब कर्नाटक राज्य परिवहन महामंडळाशी निगडीत आहे.
(२) व (३) होय.
(४) राज्य परिवहन महामंडळाच्या दि.२७.०७.१९८७ च्या परिपत्रकान्वये सर्व विभागीय कार्यालयास आंतरराज्य मार्गावर शिक्षण संस्थेत जाण्या-येण्यासाठी विद्यार्थ्यांना विद्यार्थी मासिक सवलतीचे पास देण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात पासेस अनुज्ञेय आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात मोरांच्या संवर्धनासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२१) १३७३२२ (१२-०७-२०१९). डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिवद शिवारातील गोईनंदी (ता.चांदवड, जि.नाशिक) परिसरात दोन-तीन मोरांचा संशयास्पद मृत्यू झाला असून सदर मोरांचा मृत्यू हे नैसर्गिक नसून मोर तस्करीचा प्रकार असल्याचा संशय स्थानिकांनी व्यक्त केला असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अकोला जिल्हयातील कारंजा- सोहळ काळवीट अभयारण्याच्या कार्यक्षेत्रातील जंगलात पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने राष्ट्रीय पक्षी मोरांचे अस्तित्व धोक्यात आले असून वनविभागाकडून मोरांच्या संवर्धनासाठी उपाययोजना केल्या जात नसल्याचेही माहे एप्रिल, २०१९ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहे,

(४) असल्यास, त्यानुसार मोरांच्या संशयास्पद मृत्यूस जबाबदार असण्या-या संबंधितांवर कारवाई करण्यासह राज्यात मोरांच्या संवर्धनासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) कारंजा-सोहळ काळवीट अभयारण्याच्या कार्यक्षेत्रात मोर तसेच इतर सर्व पक्षी व प्राण्यांकरीता उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची मुबलक व्यवस्था होण्याच्या दृष्टिने गिर्डा नियतक्षेत्रात ११ पानवठे तसेच सोमठाण नियतक्षेत्रात ७ पानवठयाची सोय करण्यात आली आहे.

तसेच या पानवठयांवर नियमीतरित्या आवश्यकतेनुसार टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. मोरांप्रमाणे इतर वन्यप्राण्यांसाठी पिण्याचे पाण्यासाठी कुंडया ठेवण्यात आल्या असून त्यामध्ये पाणी पुरवठा करण्यांत येवून नियमित खाद्याची व्यवस्था करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांना सेवेत नियमीत करण्याबाबत

**(२२) १३७४२४ (१३-०७-२०१९). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवर २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांकडे मेट्रो, मोनो, रेल्वे यासारख्या संवेदनशील ठिकाणाच्या सुरक्षेची जबाबदारी दिली तरीही या जवानांना कंत्राटी पध्दतीवरच काम करावे लागत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र सुरक्षा बलातील जवानांनी आपल्या मागण्यांसाठी संप पुकारल्यामुळे जवळपास तीन हजार जवानांची सेवा समाप्त करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जवानांना कंत्राटी पध्दतीने काम करावी लागत असल्याने त्यांच्यात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या जवानांना कायम करण्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०७-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या आस्थापनेवरील कार्यरत सुरक्षा रक्षकांनी दि.१७/०९/२०१७ रोजी अचानक बेकायदेशिररीत्या संप पुकारल्यामुळे संपात प्रत्यक्ष सहभागी झालेल्या २४५७ सुरक्षा रक्षकांची सेवा समाप्त करण्यात आलेली होती. त्यापैकी ६७६ सुरक्षा रक्षकांचा संपात सहभाग आढळून न आल्याने त्यांचा अभिलेख तपासून त्या सुरक्षा कर्मींना पुन्हा महामंडळच्या सेवेत दाखल करुन घेतले आहे. उर्वरीत १७८१ सुरक्षा कर्मीचा संपात प्रत्याक्ष सहभाग आढळून आल्याने त्यांना सेवेत पुन्हा दाखल करुन घेतलेले नाही.
(३) हे खरे नाही.
(४) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे शासनाचे वैधानिक महामंडळ असून महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम २०१० मधील कलम ६(२) नुसार महामंडळाचे सदस्य (जवान) यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याची तरतूद आहे. कंत्राटी नियुक्ती करतेवेळी महामंडळाशी केलेल्या करारातील अटी व शर्थी नुसार जवानांना कायमस्वरुपी नोकरीचे हक्क प्राप्त होत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वनपरिक्षेत्र परिसरात मानव आणि वन्यप्राण्यामधील संघर्ष टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२३) १३७४३८ (१२-०७-२०१९). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वनपरिक्षेत्रातील वाघ, बिबट्या आणि हत्ती या वन्यप्राण्यांच्या मानवी वस्तीतील संचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभुमीवर माणूस आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी राज्याचे स्वतंत्र धोरण निश्चित करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत दिले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच पांढरकवडा वनविभाग व टिपेश्वर अभयारण्य (जि.यवतमाळ) येथे वाघांची संख्या वाढत असून त्यांचे संचार क्षेत्रही वाढले असल्याने या परिसरात मानव आणि वन्यजीव

यांच्यतील संघर्ष टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्या जात नसल्याने येथे मानवी जीवनाला वन्य प्राण्यांपासून धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मानव आणि वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी स्वतंत्र धोरण निश्चित करण्यासाठी राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे,
(२) पांढरकवडा वन विभाग व टिपेश्वर अभयारण्य अंतर्गत वाघांची संख्या वाढत असून त्यांचे संचार क्षेत्रही वाढले आहे. मानव व वन्यप्राणी यांचा संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने खालीप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

• वाघाच्या हल्ल्यापासून बचावाकरीता काय करावे व काय करुन नये याकरीता उपाययोजना बाबतचे भिंती पत्रके (Poster) गावोगावी लावण्यात आले आहेत.
• वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राच्या जवळच्या भागामध्ये दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.
• मानव व वन्यप्राणी यांचा संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने जनजागृती करणात येते.
• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती करण्यात येते.
• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या इसमाच्या वारसास तसेच पशुहानी झालेल्या लाभार्थ्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
• मानवाचा वनावर अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजने अंतर्गत वनालगत असलेल्या गावामधील ग्रमस्थांना एल.पी.जी. गॅस रास्त दरात वाटप करण्यात येते.

(३) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे देशात लागू असणा-या मार्गदर्शक सूचनांनूसार मानव-वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनाबाबत राज्याचे विशेष धोरण ठरविण्याच्या दृष्टीने दिनांक १३/०३/२०१९ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),नागपूर यांचे अध्यक्षतेखाली १० सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली असून पूढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमधील कांजुर मार्ग (पुर्व) येथील आर्केड अर्थ या गृहप्रकल्पाचे बांधकाम सुरू असतांना अपघात होऊन गंभीर जखमी झालेल्या कामगारांना मोबदला देण्याबाबत**

**(२४) १३८२६९ (१५-०७-२०१९). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील कांजुर मार्ग (पुर्व) येथील आर्केड अर्थ या गृहप्रकल्पाचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास सुमारे ५.०५ वाजता अपघात होवून श्री अनिल इंगळे व श्री जगदीश मौर्य हे कामगार गंभीर जखमी झाले असल्याची बाब माहे, नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्षेत्रीय सरकारी कामगार अधिकारी व सहाय्यक कामगार आयुक्त यांनी दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास अपघात स्थळाच्या पाहणीत बांधकामाच्या ठिकाणी कामगार सुरक्षीततेबाबतच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्याने कामगार विभागाने सदर बांधकामास स्थगिती देण्याबाबतचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अपघातातील जखमी श्रमीकांना कामगार विभागाने मोबदला मिळवून दिलेला आहे काय, मोबदल्याचे स्वरूप काय आहे,

(४) तसेच, कामगार आयुक्त यांनी विकासकाकडून कामगार सुरक्षीतता देण्याच्या हमीपत्रावर बांधकाम मनाई आदेश रद्द केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, क्षेत्रीय सरकारी अधिकारी व कामगार उपायुक्त यांनी विकासकाशी संगनमत/गैरव्यवहार करून विकासकास पाठीशी घालण्यासाठी विकासकास अभय देणारा चौकशी अहवाल सादर केला असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने विकासकास अभय देणा-या अधिका-यांविरूध्द व विकासकाविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (२६-०८-२०१९) :** (१) हे अंशतः खरे आहे.

मे.आर्केड डेव्हलपर्स प्रा.लि. या आस्थापनेच्या बांधकामाच्या ठिकाणी दि.०५.१०.२०१८ रोजी खडीचा डंम्पर घेवून आलेले ड्रायव्हर श्री. अनिल इंगळे हे गंभीर जखमी झाले आणि क्लिनर श्री. जगदीश मौर्या हे किरकोळ जखमी झाले.

(२) होय हे खरे आहे.

दि.१२.०२.२०१९ रोजी बांधकाम बंद करण्याचे मनाई आदेश क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी पारित केले.

(३) जखमींना वैद्यकीय उपचाराकरिता रु.४,९९,०९५/- इतका खर्च झाला असून सदर खर्च मे. आर्केड डेव्हलपर्स प्रा.लि., (मुख्य मालक), व स्ट्रॉंगबिल्ट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. (कंत्राटदार) यांनी केला आहे. तसेच, हॉस्पिटलमध्ये दाखल असलेल्या कालावधीतील अपघाताच्या दिनांकापासूनचे वेतन व्यवस्थापनाने अदा केले आहे.

(४) हे खरे आहे.

कामबंद मनाई आदेशावर कामगार आयुक्त तथा मुख्य निरिक्षक यांच्यासमोर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ चे नियम २६३(४) नुसार दाखल अपिलावर सुनावणी झाली. अपिलकर्ता व प्रतिवादी यांचे म्हणने

विचारात घेऊन दि.२५.०३.२०१९ रोजी भविष्यात व्यवस्थापनाकडून अधिनियमातील सुरक्षतेच्या तरतुदींचे पालन करण्याच्या अटींवर क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी दिलेले मनाई आदेश कामगार आयुक्त तथा मुख्य निरिक्षक महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ यांनी रद्द केले.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आधारवाडी कचराभूमी बंद करण्यात येत असल्याबाबत**

**(२५) १३८३३१ (११-०७-२०१९). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा कचरा वीस-पंचवीस वर्षांपासून सामावून घेत असलेली आधारवाडी कचराभूमी बंद करण्याचे आदेश देण्यात असले तरी पर्यायी जागा नसल्याने त्याच ठिकाणी कचरा टाकण्यात येत असल्याचे निदर्शास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचराभूमी नष्ट करण्यासाठीचा प्रस्ताव आयुक्तांपुढे मांडला असता अत्यल्प शुल्क केवळ या कारणामुळे सदर प्रकल्प प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा प्रकल्प केवळ कागदोपत्री असल्याने सदर प्रकरणी आयुक्तांमार्फत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१९) :** (१) आधारवाडी येथील क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्यासाठी दि.१७.०४.२०१७ रोजी कंत्राटदारास आदेश देण्यात आलेले आहेत.

तथापि मौजे उंबर्डे व बारावे येथील एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास स्थानिक नागरिकांचा विरोध होत असल्याने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कचरा सद्या आधारवाडी क्षेपणभूमीवर टाकण्यात येतो, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचऱ्याच्या शास्त्रोक्त प्रक्रियेसाठी शहर विकास योजनेंतर्गत आरक्षित असलेल्या मौजे उंबर्डे व बारावे येथे एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व शास्त्रोक्त भरावभूमी उभारण्यासाठी येथील प्रकल्पांना पर्यावरण विभागाकडून ना-हरकत दाखला दि. ०८.०६.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. मौजे मांडा-टिटवाळा येथील प्रकल्पासाठी पर्यावरण विभागाचा “ना-हरकत दाखला” प्राप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

त्यानुसार मौजे उंबर्डे व बारावे येथील प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे. सद्यस्थितीत मौजे उंबर्डे येथील प्रकल्पाचे काम सुरू असून मौजे बारावे येथील प्रकल्पाच्या

विरोधात श्री. राजेश लुल्ला व इतर यांनी राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडे दावा दाखल केला. हरीत लवादाने सदर प्रकरण निवृत्त न्यायाधिश देवधर यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय घनकचरा व्यवस्थापन समितीकडे वर्ग केले आहे. सुनावणीची प्रक्रिया सदर समितीसमोर सुरू असल्याने प्रस्तुत प्रकरण तात्पुरते स्थगित ठेवण्यात आले आहे.

दि. ८.०७.२०१९ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली या विषयाबाबत झालेल्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) मौजे उंबर्डे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम दि.१५.०९.२०१९ पर्यंत पूर्ण करून प्रकल्प कार्यान्वित करावा.

२) कल्याण-डोंबिवली शहरातील निर्मितीच्या जागी कचऱ्याचे विलगीकरण करून विलगीकृत ओला व सुका कचरा मौजे बारावे येथील प्रकल्पात जाईल, याची दक्षता घ्यावी. सदर प्रकल्पाचे काम दि.१५.०१.२०२० पर्यंत पूर्ण करून प्रकल्प कार्यान्वित करावा.

३) मौजे उंबर्डे व मौजे बारावे येथील घनकचरा प्रकल्प कार्यान्वित करून आधारवाडी येथील डम्पिंग ग्राऊंड शास्त्रोक्तरीत्या जैव प्रक्रिया (Bio-mining) करून २ वर्षात पूर्णपणे बंद करणे.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या आयुक्तांनी निलंबनाच्या काढलेल्या आदेशाबाबत**

**(२६) १३८३३२ (१२-०७-२०१९). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण- डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेत सुमारे डझनभर अधिकारी व कर्मचारी सध्या लाचखोरीच्या प्रकरणात निलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त आयुक्त श्री.संजय घरत यांना लाचखोरीच्या प्रकरणात निलंबित केले असून या पदाचा भार उपायुक्त श्री.सुरेश पवार यांच्याकडे सोपविण्यात आला असल्याचे आदेश आयुक्तांनी काढल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाचखोरीत दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन या प्रकरणी कोणती कारवाई करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१९) :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सद्यस्थितीत १७ अधिकारी/कर्मचारी लाचखोरीच्या प्रकरणात निलंबित आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. संजय घरत यांना दि. १३.०६.२०१८ रोजी लाचेचा सापळा प्रकरणी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, यांनी अटक केल्यामुळे त्यांना दि. १४.०६.२०१८ पासून निलंबित करण्यात आले आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे कामकाज सुरळीत सुरू राहण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेचे सेवाजेष्ठ उपआयुक्त श्री. पवार यांचेकडे अतिरिक्त आयुक्त यांचेकडील फक्त वैद्यकीय आरोग्य खात्याचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

(३) व (४) ॲन्टी करप्शन ब्युरोमार्फत लाचेचा सापळा प्रकरणी अटक झालेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील अधिकारी/कमर्चारी यांचेविरूध्द तात्काळ निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सापळा कार्यवाही झालेल्या अधिकाऱ्यांची प्रकरणपरत्वे विभागीय चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात येतो तसेच त्यांची पदस्थापना अकार्यकारी पदावर करण्याचीही कार्यवाही करण्यात येते.

तसेच अपचारी अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द अभियोग दाखल करण्यास विहीत मुदतीत मंजूरी देण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिवडी बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रस्तावाबाबत**

**(२७) १३८५९१ (११-०७-२०१९). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवडी बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी मुंबई पोर्ट ट्रस्टने अभ्यास करुन प्रस्ताव तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव मुंबई पोर्ट ट्रस्टने केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम म्हाडाने करावे वा मुंबई पोर्टट्रस्टने करावे याबाबतचा निर्णय शासनाने घ्यावयाचा असल्याने शासनाने याबाबत निर्णयात्मक मान्यता केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे प्रस्तावाव्दारे दिली आहे काय,
(४) असल्यास, शिवडीच्या बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०१९) :** (१), (२), (३) व (४) शिवडी बी. डी. डी. चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाचा सर्वांगिण सुसाध्यता अहवाल (Feasibility Report) शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेने मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्याकडे म्हाडाने दि.१६.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

तसेच मुंबई पोर्ट ट्रस्टने शिवडी बी. डी. डी. चाळीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव तयार केला असुन, सदरहू प्रस्ताव विश्वस्त ठराव क्र.२१९, दि.२६.१२.२०१८ व्दारे मंजुर झाला असुन, सदरहू प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे, असे सचिव, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चोपडा (जि.जळगांव) आगारात नवीन बसेस पुरविण्याबाबत**

**(२८) १३८७९६ (१५-०७-२०१९). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) आगारातील बसेसची वयोमर्यादा जास्त झाल्यामुळे चोपडा आगारासाठी नवीन ३५ बस गाडया पुरविण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने नवीन बसेस पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०८-२०१९) :** (१) होय.

(२) चोपडा आगारास जून, २०१९ पर्यंत एमएस धातूमध्ये बॉडी पुनर्बांधणी केलेल्या १२ व मध्यवर्ती कार्यशाळेत बॉडी पुनस्थितीकरण केलेल्या ३ वाहनांचा पुरवठा करण्यात आलेला आहे व सद्यस्थितीत नवीन साध्या परिवर्तन बसेस खरेदीची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, आगारातील बसेसची आर.टी.ओ., आर.सी. व हेवी रिपेअरिंगची कामे करुन देण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत फॉरेस्ट नर्सरी ते होळकर पुल या नदी पात्राचे सुशोभिकरण करण्याबाबत**

**(२९) १३८८९० (१२-०७-२०१९). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत फॉरेस्ट नर्सरी ते होळकर पुल या सुमारे ३.३० कि.मी. नदी पात्रातील गाळ, जलपर्णी, पानवेली इत्यादी काढून त्या ठिकाणी सुशोभिकरणाची योजना आखण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हे काम केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१९) :** (१) नाशिक स्मार्ट सिटी योजनेंतर्गत फॉरेस्ट नर्सरी ते होळकर पूल या ३.३० कि.मी. नदी पात्रातील गाळ काढणे व गोदावरी नदीच्या रामवाडी पूल ते होळकर पूल दरम्यान सुशोभिकरणाचे काम करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे.

(२) सदर दोनही प्रकल्प हे निविदाधीन आहेत.

(३) व (४) नाशिक स्मार्ट सिटी कडून जानेवारी, २०१८ रोजी उपरोक्त दोन कामांच्या एकत्रित निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या.

• सदर निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने प्रकल्पाचे विलगीकरण करून दोन स्वतंत्र निविदा सप्टेंबर, २०१८ मध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

• सदर निविदा जास्त दराने प्राप्त झाल्याने सक्षम प्राधिकारी स्तरावर सदर निविदा रद्द करण्याचे नाशिक स्मार्ट सिटी मार्फत ठरविण्यात आले.

• सदर निविदेस अपेक्षीत प्रतिसाद मिळत नसल्याबाबतच्या कारणांची तपासणी करून त्यानुसार आवश्यकता असल्यास निविदेमध्ये तशा स्वरूपाच्या सुधारणा करून निविदा प्रक्रिया अंतिम करणेबाबत सूचना नाशिक स्मार्ट सिटी यांना देण्यात आल्या आहेत.

---

## अमरावती येथील हिंदु स्मशानभूमीतून लहान बालकांचे पुरलेले अवशेष गहाळ झाल्याबाबत

**(३०) १३९२७५ (१३-०७-२०१९). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील हिंदु स्मशानभूमीतून लहान मुलाचे अवशेष खड्डा खोदुन अज्ञात व्यक्तीने गहाळ केल्याची बाब माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी राजापेठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या संदर्भात चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता अमरावती येथील स्मशानभूमीत दफन केलेले मृत बाळ सुस्थीतीत मिळून आले. हिन्दु स्मशान भूमीतून लहान मुलांचे अवशेष खड्डा खोदून गहाळ केल्याची बाब आढळून आलेली नसल्याने गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील शहानुर धरण्याच्या कमांड भागामध्ये जलयुक्त शिवार योजनेची कामे करणेबाबत

**(३१) १३९३२६ (११-०७-२०१९). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील खोडगाव देवगाव, शेलगाव, धाडी, वडाळी, दहीगाव हि गावे शहानुर धरणाच्या कमांड भागामध्ये येत असल्यामुळे तेथे जलयुक्त शिवारची कामे करता येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत पाच वर्षापासून अनियमित पावसामुळे धरणामध्ये असलेला पाणी साठा केवळ पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित असल्यामुळे कालवा मार्फत शेतीला पाणीपुरवठा करणे बंद केले आहे तसेच या भागातील शेती पूर्णता बागायती असून भूगर्भातील पाण्याचा साठा कमी झाल्यामुळे बागायती शेती नष्ट होत आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर भागात कमांड विभाग असल्यामुळे जलयुक्त शिवाराची कामे करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील कमांड विभागामध्ये जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामे कधीपर्यत करण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२८-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) मागील पाच वर्षापासून खोडगाव, देवगाव, धाडी व दहीगाव मौजेतील शहानूर प्रकल्पाच्या पाण्याचा ईच्छुक शेतकरी सिंचनाकरीता लाभ घेत आहेत.

तसेच सुर्जी वितरीकेचे कालवा साफसफाई व गाळ काढण्याचे काम सुरू असल्यामुळे सदर कामे पूर्ण झाल्यानंतर मौजा वडाळी येथील शेतकरी सिंचनाचे लाभ घेऊ शकतील.

(३) व (४) जलसंपदा विभाग शासन निर्णय दि.१२ मार्च, २०१५ नूसार जलसंपदा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यास मान्यता देण्यात आली असून त्यानूसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नांदगांव नगरपरिषद (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथे अग्निशमन केंद्रावर अग्निशमन दलाचे कर्मचारी व अधिका-यांची नियुक्ती करण्याबाबत

**(३२) १३९३६८ (०९-०७-२०१९). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव नगरपरिषद (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथे अग्निशमन केंद्राची इमारत व अग्निशमन वाहन उपलब्ध असतांनाही या केंद्रावर अग्निशमन दलाचे कर्मचारी व अधिका-यांच्या नियुक्तीअभावी नांदगांव शहर परिसरात आग लागल्यास नांदगांव नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्राबाहेरील अन्य नगरपरिषदेंकडून अग्निशमन वाहन बोलावून आग विझवावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे आग विझविण्यास विलंब होवून आग लागलेल्या ठिकाणचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्यामुळे शासनाकडून व नगरपरिषदेकडून अग्निशामक दलाचे कर्मचा-यांची नियुक्ती करण्यास विलंब होत असल्याने नांदगाव शहरातील जनतेत असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे, चौकशी अहवालानुसार नांदगांव नगरपरिषदेच्या अग्निशमन केंद्रावर अग्निशमन दलाचे कर्मचारी व अधिका-यांची सत्वर नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१९) :** (१), (२) व (३) नांदगाव नगरपरिषदेने महाराष्ट्र अग्निशमन अभियान जिल्हास्तर योजनेतून अग्निशमन वाहन खरेदी केले असून, अग्निशमन केंद्राचे बांधकाम पुर्ण करण्यात आलेले आहे.

अग्निशमन दलाकरीता मंजूर करण्यात आलेल्या आकृतीबंधानुसार १ सहाय्यक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक, १ वाहन चालक व ४ फायरमन अशी एकूण ६ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

अग्निशमन सेवेची उक्त पदे ही तांत्रिक असल्याने, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडून विहित तांत्रिक अर्हता प्राप्त उमेदवारांची निवड करुन नेमणूकीसाठीची कार्यवाही करण्यात येणार असल्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी अहवाल सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिकेकडून आकारण्यात येत असलेला पाणीपट्टी दर जास्त असल्याबाबत**

**(३३) १३९७४८ (१३-०७-२०१९). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिकेकडून बहुतांश नागरिकांना वर्षातून फ़क्त ५० दिवसच पाणी मिळत असून महानगरपालिकेकडून देण्यात येणाऱ्या पाण्याच्या तुलनेत पाणीपट्टीचे दर एकूण साडेचार हजार रुपये असून एवढे दर कुठेही आकारण्यात येत नसल्याची बाब दिनांक १३ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाने दहा वर्षापूर्वी महानगरपालिकेला समांतर जलवाहिनीसाठी निधी दिलेला असून निधीवर व्याज १२५ कोटी जमा झाला आहे परंतु आजपर्यंत महानगरपालिकेला समांतर जलवाहिनी टाकता आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनातर्फे कोणती कारवाई व उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१९)** : (१) औरंगाबाद महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार पाणीपुरवठा आणि पाणीपट्टी उपविधी २०११ तयार केले असुन, त्यानुसार नागरिकांना पाणीपट्टीचे दर आकारण्यात येतात ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) औरंगाबाद महानगरपालिका समांतर जलवाहिनी योजनेंतर्गत संपुर्ण पाणीपुरवठा योजना कन्सेशनर मार्फत पीपीपी तत्त्वावर राबवित आहे.

तथापि, सदर प्रकल्पामध्ये अनेक अनियमितता केल्यामुळे कन्सेशनरला महानगरपालिकेने टर्मिनेशन नोटीस बजावली आहे. त्याबाबत कन्सेशनरने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तीर्थक्षेत्र आळंदी (जि.पुणे) येथील लॉजवर गैरकृत्ये होत असल्याबाबत

**(३४) १३९८७९ (१३-०७-२०१९). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीर्थक्षेत्र आळंदी (जि.पुणे) येथे मोठ्या प्रमाणात यात्रेकरू येत असून त्यांना राहण्यासाठी सोय म्हणून लॉजचा उपयोग होत असताना सध्या येथील लॉजवर मोठ्या प्रमाणात वेश्या व्यवसाय सुरु असल्याच्या अनेक तक्रारी स्थानिकांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लॉज मध्ये बाहेरील गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींचा वावर वाढत असून स्थानिक महिला, मुली, यात्रेकरू यांच्या छेडछाडीचे प्रकार वाढत असल्याने अशा अनधिकृत लॉजवर तत्काळ कारवाई करण्याची लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मार्च २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुखमंत्री, गृहराज्यमंत्री, जिल्हाधिकारी पुणे तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून तीर्थक्षेत्र आळंदी येथील अनाधिकृत वेश्या व्यवसाय करणाऱ्या लॉजवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१९)** : (१) (२) व (३) स्थानिक लोकांनी दिलेल्या तक्रार अर्जावरून सदर परिसरात पोलीस पेट्रोलींग वाढवून तसेच लॉज मालक यांच्या बैठका घेवुन त्यांना लॉजवर वेश्या व्यवसाय चालणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यांत आल्या आहेत. तसेच देहूफाटा आळंदी परिसरात रस्त्याचे कडेस असभ्य वर्तन करणा-या ४६ महिलांवर कारवाई करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे स्थानिक महिलेची छेड काढल्याबाबत पीडितीने दिलेल्या फिर्यादीवरून दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड शहर येथे गु.र.नं. २९३/२०१९ भा.दं.वि. कलम ३५४ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पंढरपूर शहरातील (जि.सोलापूर) नामसंकिर्तन सभागृहाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३५) १४००८४ (०९-०७-२०१९). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहरामध्ये (जि.सोलापूर) येथील शासनाच्या योजनेतून मंजूर असलेल्या नामसंकिर्तन बहुउद्देशिय सभागृहास मान्यता मिळून सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात २० कोटी रूपयांची तरतुद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त नामसंकिर्तन सभागृहाच्या बांधकामासाठी २४ महिन्यांची मुदत संबंधित ठेकेदारास देण्यात आली असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सभागृहाच्या कामाचा १० महिन्यांचा अवधी झाला असतांनाही अद्यापही प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाला जबाबदार असणाऱ्या संबंधित ठेकेदारावर स्थानिक प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उपरोक्त सभागृहाचे काम कधी व किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१९) :** (१), (२), (३) व (४) • नामसंकीर्तन सभागृह उभारण्याच्या कामाची एकूण अंदाजपत्रकीय किंमत रुपये ३९.४७ कोटी एवढी आहे.

• यापैकी पहिल्या टप्प्यात रुपये २१.२४ कोटींची कामे प्रस्तावित असून जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी या कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे.

• या कामांसाठी ई-निविदा मागविण्यात आल्या. पुरेश्या प्रतिसादा अभावी ३ वेळा फेरनिविदा मागविण्यात आल्या. अंतिमत: प्राप्त झालेल्या निविदाकाराचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९०% जादा असलेला दर स्विकारुन निविदा मंजूर करण्यात आली. दिनांक ५ जून, २०१८ रोजी निविदाकारास कार्यारंभ आदेश देण्यात आले.

• निविदेतील अटींनुसार १८ महिन्यात म्हणजेच डिसेंबर, २०१९ पर्यंत हे काम पूर्ण करणे अपेक्षित होते.

• कंत्राटदाराकडून कामाची अपेक्षित प्रगती दिसून न आल्याने व दरम्यान कंत्राटदाराने काम थांबविल्याची बाब निदर्शनास आल्याने त्यांना नोटीस देऊन २ वर्षासाठी काळ्या यादीत (Black list) टाकण्यात आलेले आहे. तसेच दिनांक २८ जून, २०१९ रोजी स्थायी समितीच्या मंजूरीने कामांची फेरनिविदा मागविण्यात आलेली आहे. यासंदर्भात पुढील कार्यवाही नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात दुष्काळग्रस्त भागात वन्यप्राण्याच्या जंगलामध्ये पाणवठे करण्याबाबत

**(३६) १४०२१० (०८-०७-२०१९). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण (जि.सातारा) तालुक्यात बहुतांश तलाव, विहिरी कोरडया पडल्यामुळे अन्नपाण्यासाठी वन्यप्रांण्याचा वावर गावागांवात दिसुन येत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात दुष्काळग्रस्त भागात सर्व पाण्याचे स्त्रोत कोरडे पडले असल्याने वन्यप्राणी अन्न व पाण्यासाठी गावात येत असल्याने सदरहू वन्यजीवांसाठी ते वास्तव्य करित असलेल्या जंगलामध्येच पाणवठे किंवा इतर आवश्यक उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०८-२०१९) :** (१) माण (जि.सातारा) तालुक्यामध्ये तीव्र उन्हाळयामुळे वनक्षेत्रातील पाण्याचे स्त्रोत आटल्याने वन्यप्राणी पाण्याच्या व भक्ष्याच्या शोधात नागरी वस्तीत आल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत.
(२) राज्यात दुष्काळग्रस्त भागातील वनक्षेत्रामध्ये तसेच वन्यप्राण्यांचे वास्तव्य असलेल्या सर्वच क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी वन्यप्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येते. कोल्हापूर वनवृत्तात वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था होण्यासाठी वनतळी, सौरपंप आधारीत पाणवठे, बोअरवेल्स, नैसर्गिक झ-यांची स्वच्छता, सिमेंट बंधारे, माती बंधारे इत्यादी कामे करण्यात आलेली आहेत. सदर कृत्रिम पाणवठ्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.

तसेच वन्यप्राण्यांचे वास्तव्य असलेल्या सर्वच क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी वन्यप्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येते
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माकेगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील साठवण तलावास मान्यता देणेबाबत**

**(३७) १४०२३३ (११-०७-२०१९). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माकेगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथे साठवण तलाव बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सदर तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही होत असल्याचे मा.जलसंधारण मंत्री यांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आश्वासित केले होते, हे खरे आहे काय
(२) असल्यास, त्यानुसार उक्त तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे सर्वेक्षण व अन्वेषण,प्रशासकीय मान्यता तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२९-०८-२०१९) :** (१) व (२) माकेगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील साठवण तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. राज्य जल परिषदेकडून

मंजूर झालेल्या गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखड्यानुसार मनार खोऱ्यामध्ये पाणी उपलब्ध नसल्याने पाणी उपलब्धता प्रस्ताव स्थगित करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणारे "शिवाजीचे उदात्तीकरण : पडद्यामागचे वास्तव " या पुस्तकावर कारवाई करण्याबाबत**

**(३८) १४०२४३ (१५-०७-२०१९). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करुन समाजात जातीय तेढ वाढविणारे" शिवाजीचे उदात्तीकरण: पडद्यामागचे वास्तव" या पुस्तकाच्या विरोधात शासनाकडे काही तक्रारी आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुस्तक समाजात जातीय तेढ निर्माण करणारे असून यांसदर्भात अनेक लोकप्रतिनिधींनी सदर पुस्तकावर बंदी आणण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, समाजात राष्ट्रपुरुषांची बदनामी केल्यामुळे समाजात जातीय तेढ वाढून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे लक्षात घेऊन चौकशीच्या अनुषंगाने शासनाने पुस्तकावर बंदी आणण्याबाबत तसेच सदर पुस्तकाचे मुद्रक,प्रकाशक,लेखक यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१९) :** (१) होय.
(२) होय.
(३), (४), (५) यासंदर्भात "शिवाजीचे उदात्तीकरण पडदयामागचे वास्तव" या पुस्तकाच्या प्रती उपलब्ध झाल्या नाहीत. तक्रारदारांनाही पुस्तकाची प्रत उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली आहे. तथापि, त्यांचेकडूनही पुस्तकाची प्रत उपलब्ध झाली नाही. याबाबत समाजात जातीय तेढ वाढून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे या विभागाच्या निदर्शनास आले नाही.

---

**तारापूर (जि.पालघर) येथील एम.आय.डी.सी. परीसरातील बजाज हेल्थ केअर प्रा.लि. व सिरॉन ड्रग्ज या कंपनीत झालेल्या केमिकल बाधेमुळे २५ कामगारांच्या डोळ्यांना झालेली दुखापत**

**(३९) १४०२७२ (१५-०७-२०१९). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) येथील एम.आय.डी.सी. परीसरातील बजाज हेल्थ केअर प्रा.लि. व सिरॉन ड्रग्ज या कंपनीत झालेल्या केमिकल बाधेमुळे २५ कामगारांच्या डोळ्यांना गंभीर दूखापत झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत व जखमी कामगारांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (२७-०८-२०१९) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

एम.आय.डी.सी. तारापूर, ता. बोईसर, जि.पालघर येथे असणाऱ्या मे.बजाज हेल्थकेअर प्रा.लि.,प्लॉट नं.एन-१७८ या कारखान्यात दि.०४.०५.२०१९ रोजी दु.१.३० वाजण्याच्या सुमारास ॲसीटीक अनहायड्राईड या रसायनाची गळती होवून तेथे काम करणाऱ्या ३० कामगारांच्या डोळ्याला त्याची बाधा झाली. यामध्ये डोळ्याला सूज येणे, डोळे लाल होणे इ. लक्षणे दिसून आली. तद्नंतर त्यांना रुग्णालयात दाखल करुन त्यांच्यावर उपचार केल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले.

सिरॉन ड्रग्ज या कंपनीत अशी कोणतीही दुर्घटना घडलेली नाही.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून त्या चौकशीमध्ये कारखान्यात नव्याने लावण्यात आलेल्या ॲसिटीक अनहायड्राईड या रसायनाच्या टाकीला असणा-या पंपाचे सिल लिक झाले व त्यातून सदर रसायनाची गळती सुरु झाली. त्यामुळे तेथे काम करणाऱ्या कामगारांच्या डोळ्याला बाधा झाली. सदर रसायनाचा डोळयावरील परिणाम हा दुस-या दिवशी म्हणजे दिनांक ०५.०५.२०१९ रोजी सकाळी सुरु झाल्याने डोळयांना सूज व खाज होऊ लागल्याने कामगारांना नजीकच्या खाजगी इस्पितळात दाखल करण्यात आले. त्यांना उपचारानंतर दिनांक ०८.०५.२०१९ ते १३.०५.२०१९ रोजी या दरम्यान घरी सोडण्यात आले.

याबाबत उप संचालक, वसई यांचेकडून चौकशी करण्यात आली असून याबाबत कारखाने अधिनियम १९४८ चे कलम ७A(२)(b) व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ चे नियम ४(२) च्या भंगासाठी भोगवटादाराविरुध्द खटला क्र.८२७७/२०१९ हा एकत्रित एक खटला व नियम ११५(१) व नियम ११५(२) च्या भंगासाठी व्यवस्थापकाविरुध्द खटला क्र.८२७८/२०१९ हा एकत्रित एक खटला मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आला आहे.

सदर अपघातामध्ये जखमी झालेल्या कोणत्याही कामगाराला कायमस्वरुपी अपंगत्व आलेले नाही. व्यवस्थापनाने जखमी कामगारांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती दिलेली आहे. तसेच वैद्यकीय रजेचा पगार पुढील पगारासोबत देण्यात आलेला आहे. जखमी कामगारांना प्रत्येकी रु.२०००/- इतके सानुग्रह अनुदान कारखाना व्यवस्थापनाकडून देण्यात आलेले आहे. अशा प्रकारे व्यवस्थापनाने जखमी कामगारांना मदत केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वलवण (ता.महाबळेश्वर, जि सातारा) येथील सहयाद्री व्याघ्रप्रकल्प बामणोली वनक्षेत्रपाल कार्यालय हद्दीत बिबटयाची झालेली शिकार**

**(४०) १४०५४५ (१२-०७-२०१९). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वलवण (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) येथील सहयाद्री व्याघ्रप्रकल्प बामणोली वनक्षेत्रपाल कार्यालय हद्दीत बिबटयाची वनमजूराकडून शिकार करण्यात आली असल्याची घटना दिनांक १६ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा अहवाल सहयाद्री व्याघ्रप्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांनी वरिष्ठांना सदर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालानुसार शासनाने बिबटयाची शिकार करणा-या दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०८-२०१९) :** (१) दिनांक ०५.०४.२०१९ रोजी मौ. वलवण, ता. महाबळेश्वर, जि. सातारा या गावाचे हद्दीत फिरती करत असताना एका वनमजूरास बिबट्याची काही हाडे आणि केस निदर्शनास आले.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी तपास केला असता घटनास्थळी पाणवठयाजवळ शिकारीच्या हेतूने मचाण तयार केल्याचे निदर्शनास आले आहे व सदर पाणवठ्याजवळ बंदुकीच्या काडतुसाच्या फायर केल्यानंतरचे उर्वरित ३ भाग मिळून आले आहेत. सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**किनवट (जि.नांदेड) तालुक्यात नीलगाईचा विहिरीत पडून झालेला मृत्यु**

**(४१) १४०५८१ (१५-०७-२०१९). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यात तीव्र पाणीटंचाई असल्याने पाण्याच्या शोधात जनावरे गावात येत असून एका नीलगाईचा वसंतवाडी येथे विहिरीत पडून मृत्यु झाला असल्याचे दिनांक १६ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार किनवट तालुक्यातील पाणी टंचाई दूर करुन जनावरांना पुरेशा प्रमाणात पाण्याची व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०८-२०१९) :** (१) मौजे वसंतवाडी, वनपरिक्षेत्र किनवट येथे दिनांक १५.०५.२०१९ रोजी एक निलगाय मृत्यु झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(२) रात्रीच्या वेळी विहिरीचा अंदाज न लागल्यामुळे निलगाय विहिरीत पडली. विहिरीमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ असल्याने गाळामध्ये अडकल्यामुळे निलगायीचा मृत्यु झाला असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले आहे.

किनवट तालुक्यातील वन्यप्राण्यांना जंगलामध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता ३४ नैसर्गिक पाणवठे आहेत. तसेच २७ कृत्रीम पाणवठे तयार करण्यात आले असून त्यामध्ये टँकरद्वारे आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरात पोलीसांनी 'ऑपरेशन क्रॅक डाऊन' सारखी मोहीम राबविण्याबाबत**

**(४२) १४०७१३ (११-०७-२०१९). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात पोलीसांनी 'ऑपरेशन क्रॅक डाऊन' अंतर्गत सहा दिवसात ४२२५ गुन्हेगारांची चौकशी व तपासणी केली असता ३२८ गुन्हेगारांविरुध्द प्रतिबंधक कारवाई केली असल्याबाबतची माहिती माहे जानेवारी, २०१९ च्या शेवटाच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात गुन्हेगारांवर अंकुश लावण्यासाठी पोलीस आयुक्तांच्या नेतृत्वात दिनांक २० ऑगस्ट ते १० सप्टेंबर 'ऑपरेशन क्रॅक डाऊन' पार्ट-१ व दिनांक १५ नोव्हेंबरला 'ऑपरेशन क्रॅक डाऊन'पार्ट-२ ची मोहीम राबविण्यात आलेली होती, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, या मोहीमेतंर्गत गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाई, अवैध प्रकारे हत्याराचा उपयोग करणा-यांना जेरबंद करणे, मारपीट अथवा लुटमारीच्या गुन्ह्यात लिप्त आरोपीविरुध्द प्रतिबंधक कारवाई, मादक पदार्थांच्या विक्रीत लिप्त आरोपींविरुध्द कारवाई करण्याची मोहीम राबविण्यात आलेली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरात वाढत असलेल्या गुन्हेगारींवर अंकुश लावण्याकरीता पुन्हा 'ऑपरेशन क्रॅक डाऊन' सारखी मोहीम पोलीस विभागाकडुन यावर्षी सुध्दा राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

अभिलेखावरील सराईत गुन्हेगार यांना चेक करणे, आरोपी कुटूंब परिवारामध्ये राहून काम धंदा करीत असल्यास त्यास चेक करुन गुन्हेगारी वृत्तीपासून दूर राहण्याची समज देणे, अगर संशयीत हालचाली दिसल्यास सीआरपीसी च्या विविध कलमान्वये प्रतिबंधक कारवाई करणे, सतत चेक करत राहणे अशी यशस्वी क्रॅक डाऊन मोहीम राबविण्यात आलेली आहे.

| मोहिमेचे नाव | दिनांक | चेक गुन्हेगार | कारवाई | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रतिबंधक | अवैध शस्त्र जप्ती | अंमली पदार्थ रेड |
| ऑपरेशन क्रॅक डाऊन-१ | २७/०८/१८ ते १०/०९/१८ | ६६६१ | १७५० | ६६ | ५ |
| ऑपरेशन क्रॅक डाऊन-२ | १५/११/१८ ते २०/११/१८ | ४२५२ | ३०४ | २४ | २ |

(४) ऑपरेशन क्रॅक डाऊन प्रमाणे ऑपरेशन वाश आऊट मोहिम राबविण्यात आलेली आहे.
दाखल गुन्ह्यात १९० घट झालेली दिसून येते.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे |
|---|---|---|
| २०१८ जुन अखेर पर्यंत | ४३२२ | २६६३ |
| २०१९ जुन अखेर पर्यंत | ४१३२ | २५३० |
| वाढ/घट | -१९० | १३३ |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यात अगरबत्ती प्रकल्प राबवून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४३) १४०७४४ (१३-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात शासनाकडून अगरबत्ती प्रकल्प राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प राबविण्यासाठी शासनाने निविदा प्रक्रिया सुरु केली आहे काय, तद्‌नुषंगाने कोण कोणत्या कंत्राटदारांची निवड करण्यात आली आहे,

(३) तसेच, उक्त जिल्ह्यात आतापर्यंत किती अगरबत्ती प्रकल्प कार्यान्वित आहेत व त्यातील किती प्रकल्प चालू व बंद स्थितीत आहेत,

(४) तसेच, उक्त प्रकल्पांवर आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे, तद्‌नुसार किती स्थानिक लोकांना रोजगार देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे तसेच सद्य:स्थितीत किती लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली करुन गडचिरोली जिल्ह्यात अगरबत्ती प्रकल्प राबवुन स्थानिकांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०१२ पासून गडचिरोली जिल्हयात वन विभागामार्फत अगरबत्ती प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यामुळे कंत्राटदाराची निवड करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) एकूण ४९ अगरबत्ती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले होते. त्यापैकी २५ केंद्र सुरु आहे व उर्वरित २४ प्रकल्प बंद आहेत.

(४) व (५) उक्त प्रकल्पावर आतापर्यंत १५५३.९५ लक्ष निधी खर्च करण्यात आले आहे. प्रस्तावानुसार ४०० लोकांना रोजगार देण्याचे निश्चित करण्यात आले. सध्यास्थितीत सुरु असलेल्या प्रकल्पावर ४५० महिलाना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्या व्यतिरिक्त कापूस वात तयार करण्याचे प्रकल्पावर २०० लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली मधील गोंडवाणा हर्ब्स प्रकल्पाबाबत**

**(४४) १४०७४९ (१५-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली विधानसभा क्षेत्रात गोंडवाणा हर्ब्स प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पातून कोणत्या वस्तूंच्या उत्पादनाचे उद्दीष्टे निश्चित करण्यात आली असुन त्यातील किती वस्तूंचे उत्पादन सुरू आहे व कितींचे बंद आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्प कोणत्या स्वरुपात देण्यात आला असुन कंत्राटदारांना दिले असल्यास त्याबाबत निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे काय, तसेच या प्रकल्पाकरिता आतापर्यंत एकूण किती निधि खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरहू प्रकल्पान्वये रोजगार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) गोंडवाना हर्ब्स वनौषधी प्रकल्पात ४० प्रकारचे चूर्ण, १० प्रकारचे तेल, बिजा ग्लास आदीच्या वस्तुचे उत्पादने निश्चित करण्यात आले असून, सर्व वस्तुचे उत्पादन सुरु आहे. वस्तुची साधारणत: बाजारपेठेतील मागणीनुसार व उपलब्ध वनौषधीप्रमाणे वस्तुचे उत्पादन वैधू मंडळाचे देखरेखी खाली सुरु आहे.

(३) सदर प्रकल्पामध्ये उत्पादीत होणाऱ्या वस्तु जिल्हा वन औषधी मंडळ यांच्या देखरेखीखाली सुरु असून कंत्राटदारामार्फत उत्पादन करण्यात येत नाही. तसेच या प्रकल्पाकरिता सन २०१४-१५ ते २०१५-१६ या वर्षात ५८.०० लक्ष रुपये एवढा निधी खर्च करण्यात आला आहे.

(४) प्रकल्पामधून वस्तु तयार करण्याकरिता आवश्यक हंगामी मजूर लावण्यात आलेले आहे. तसेच जिल्हा वैदु मंडळाचे सदस्यांना प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केले आहे. वनौषधी तयार करण्याकरिता आवश्यक कच्चा माल संयुक्त वन व्यवस्थापन समिती व गावकरी यांच्या मार्फत खरेदी करुन रोजगार देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार योजनेसाठी पुरेसा निधी न मिळाल्याबाबत

**(४५) १४०९४४ (०८-०७-२०१९). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार योजने अंतर्गत जलशिवार बांधणेसाठी पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध न झाल्याने जलशिवाराची कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यामध्ये आवश्यकतेनुसार जलशिवारची कामे न झाल्याने मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी समुद्राला जाऊन  मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यामध्ये पाण्याच्या साठ्यामध्ये वाढ होण्यासाठी  जलयुक्त शिवार योजने अंतर्गत आवश्यक निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२८-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १२०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(४६) १४१४१८ (१३-०७-२०१९). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १२०० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याच्या मंजुरीचा प्रस्ताव चार महिन्यांपेक्षाही जास्त कालवधी उलटूनही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी नवी मुंबई महानगरपालिकेने लावलेले २९४ कॅमेरे ५ वर्षात नादुरुस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास मंजूरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१९) :** (१), (२), व (३) • नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ११६७ सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे दि. ११.०१.२०१९ रोजी प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविले असता, सदर प्रस्ताव दि.२०.०६.२०१९ रोजी महासभेच्या पटलावर ठेवण्यात आला.

• तद्नंतर सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११२६, दि. २५.०६.२०१९ अन्वये सदर प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे.

• सर्वसाधारण सभेने पारीत केलेल्या ठरावामध्ये ५३० ठिकाणी एकूण १४३९ कॅमेरे समाविष्ट आहेत तसेच ५ वर्षे देखभाल व दुरूस्तीचा समावेश आहे.

• नवी मुंबई महानगरपालिकेने यापुर्वी लावलेले ३४ पीटीझेड व २४८ फिक्स कॅमेरे असे एकूण २८२ कॅमेरे कार्यरत आहेत.

• भविष्यात नवीन ठिकाणी कॅमेरे बसविण्याकरीता प्रस्तुत प्रणालीमध्ये तरतूद करण्यात आली असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहुली जहागीर (ता.अमरावती) येथै बस स्थानक होण्याबाबत

**(४७) १४१६२७ (०९-०७-२०१९). अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहुली जहागीर (ता. अमरावती) या गावाची लोकसंख्या तसेच तेथील परिसरात १५ ते २० गावे असल्याने तेथे नविन बसस्थानक बांधण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. परिवहन मंत्री यांना दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने माहुली जहागीर येथे नविन बस स्थानक बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०८-२०१९) :** (१) होय.

(२) माहुली जहागीर या गावातील राज्य परिवहन महामंडळाचा प्रवासी मार्गनिवारा रस्ता रुंदीकरणात पाडल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर ठिकाणच्या पोलीस स्टेशनच्या ताब्यातील जागेची बसस्थानकाकरीता मागणी केली असता, उक्त जागा अमरावती पोलीस विभागाने सुरक्षिततेच्या व जागेच्या अभावाच्या कारणाने देण्यास नकार दिला आहे. तथापि, माहुली जहागीर येथे राज्य परिवहन महामंडळाचा अधिकृत बसथांबा असून, सर्व राज्य परिवहन बसेस तेथे थांबत आहेत. रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांच्या सोयीसाठी तेथे प्रवासी मार्ग निवारा महामंडळाच्या स्तरावर प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यात वन्यप्राण्यामुळे शेतपीकांचे होत असलेले नुकसान**

**(४८) १४१९३४ (१२-०७-२०१९). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा, चंदगड, भुदरगड व राधानगरी तालुक्यामध्ये हत्ती, गवा व रेडे यांच्यामुळे शेतपीकांचे नुकसान होत असून आजरा तालुक्याच्या पश्चिम भागात वेळवट्टी, खानापूर व करपेवाडी परिसरातील ऊस, मेसकाठी व काजूच्या झाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्यप्रण्याकडून शेतपीकाचे नुकसान होऊ नये यासाठी हत्ती, गवा व रेडे यांचा प्रतिबंध करण्याबाबत शासनाने नेमलेल्या समितीचा अहवाल शासनाकडे सादर करूनही त्यावर अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वन्यप्रण्याकडून शेतपीकांचे नुकसान होऊ नये याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०८-२०१९) :** (१) कोल्हापूर जिल्हयातील आजरा, चंदगड, भुदरगड व राधानगरी तालुक्यामध्ये हत्ती, गवा या वन्यप्राण्याकडून शेतपीकांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

वन्यप्राण्यांनी आजरा तालुक्याच्या पश्चिम भागात वेळवट्टी, खानापूर व करपेवाडी परिसरातील ऊस व काजुच्या झाडांचे नुकसान केल्याच्या २५ घटना निदर्शनास आल्या असून प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात आले आहे.

(२) हत्तीमुळे होणारे नुकसान टाळणेकरीता उपाययोजना सुचविणेसाठी दिनांक १९.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्च स्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. मा.मंत्री (वने) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २८.११.२०१८ रोजी आयोजित बैठकीत सदर समितीने सूचविलेल्या उपाययोजनांवर मुद्देनिहाय करावयाच्या कार्यवाहीवर चर्चा होऊन आवश्यक तो निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) वन्यप्राण्यांद्वारे नुकसान होऊ नये व मानव वन्यहत्ती संघर्ष कमी व्हावा यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• वनपरिक्षेत्र स्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.

• काही क्षेत्रात वनहद्दींवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले आहेत, तसेच शीघ्र बचाव दल तयार करण्यात आली आहे.

• गावकऱ्यांच्या मदतीने टॉर्च, फटाके, अग्नीबाण इ. चा वापर करुन व हाकारा गट तयार करुन हत्तींना शेती व मानवी वस्तीपासून दूर नेण्यात येते.
• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रलंबित असलेल्या पूर्णाकृती पुतळ्याबाबत**

**(४९) १४२३३५ (१३-०७-२०१९). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रलंबित असलेल्या पूर्णाकृती पुतळ्याबाबत शासनाने आदेश देऊनही अद्यापपर्यंत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१९) :** (१) अहमदनगर महानगरपालिकेने जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २०/०७/२०१८ अन्वये, अहमदनगर शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी जागेची मागणी केली आहे.
(२) पुतळा बसविण्याबाबत महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये तरतुद केलेली आहे, असे अहमदनगर महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे सन २०११ ते २०१६ या पाच वर्षांचे आर्थिक लेखा परिक्षण करण्याबाबत**

**(५०) १४२५०३ (१३-०७-२०१९). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे सन २०११ ते २०१६ या पाच वर्षांचे आर्थिक लेखा परिक्षण करण्याचे आदेश महानगरपालिकेने शासनाच्या शिक्षण विभागाच्या लेखाधिकाऱ्यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने शिक्षण विभागाच्या लेखाधिका-यांनी लेखा परिक्षण केले आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०७-२०१९) :** (१) परभणी शहर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे सन २००१-२०१० ते सन २०१०-२०१५ या कालावधीचे अंतर्गत लेखापरिक्षण करण्याचे आदेश तत्कालीन आयुक्त यांनी तत्कालीन मुख्य लेखा परिक्षक यांना दिनांक ५.१२.२०१५ रोजी दिले होते, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) • अंतर्गत लेखा परिक्षण अहवालात सन २०१०-२०१५ या कालावधीत तत्कालीन प्रशासन अधिकारी यांनी बँकेत दाखल करण्यात येणाऱ्या वेतन यादीत फेरफार करुन अंदाजे रु.७५ लक्ष रकमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे, संबंधितांविरुध्द फौजदारी कार्यवाहीसह प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस लेखा परिक्षण अहवालात करण्यात आली आहे.
• तत्कालीन मुख्य लेखा परिक्षक यांच्या अहवालानुसार संबंधित तत्कालीन प्रशासन अधिकारी व लिपिक यांना महानगरपालिकेने निलंबीत केले असून, रोजंदारी बालवाडी शिक्षिका यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे.
• तसेच या प्रकरणी नवामोंढा पोलिस स्टेशन येथे सर्व संबंधितांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.